# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18,
# स्थानिक संस्था कर विभाग

---

## सन 2013-14 या अर्थिक वर्षाचे वार्षिक विवरण पत्र व स्थानिक संस्था करांचे निर्धारणा बाबत ....

## जाहिर सूचना

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे, स्थानिक संस्था करासाठी नोंदणीकृत असलेल्या सर्व व्यापारी/व्यवसायीक यांना कळविणेत येते की,

**(अ)** ज्या व्यापारी/व्यवसायीक यांनी सन 2013-14 या अर्थिक वर्षाचे, वार्षिक विवरण पत्र (E-II) सादर केलेले आहे. त्यांनी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधिल नियम 33 (7) मधिल तरतूदी नूसार स्थानिक संस्था कराचे निर्धारणाचे, निर्धारण / ASSESMENT करणेकामी खालिल कागदपत्रांसह संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क करावा.

1) खरेदी मालाची नोंदवही.
2) भरलेल्या स्थानिक संस्था कराच्या पावत्या व चलन, तसेच सदर चलनाचे रकमेतील स्था.सं.कराच्या अनुषंगाने सविस्तर विवरण पत्र
3) आयात मालाची बीले (मनपा हददीबाहेरील) .
4) विक्रीकर विभागाकडे विक्रीकर भरल्या चे दि.1/04/2013 ते 31/03/2014 पासूनचे विवरणाची प्रत
5) दि. 1/04/2013 पासूनची आवक मालाची नोंदवही. व जावक मालाची नोंदवही.
6) माल आलेला व पाठविलेला ट्रान्सपोर्ट व कुरीअर चलने.
7) स्थानिक खरेदीची बीले व विवरणपत्र
8) दि. 31/03/2013 रोजीचा असलेला स्टॉक किंमतीसह व साठा नोंद वही.
9) मनपा हददीत व हददीबाहेर मालविक्री केलेली बील व चलने.
10) स्थानिक खरेदी केलेल्या व मनपा हददीत विक्री व्यापा-यांची नावे, पत्ता, एलबीटी क्रं,फोन नं. यांची यादी.
11) वार्षीक ताळेबंद, नफा-तोटा पत्रक.
12) LBT return part Excel Template
13) तसेच इतर अनुषंगिक कागदपत्रे.

वरिल कागदपत्रे संबंधीत क्षेत्रिय कार्यालयातील, स्थानिक संस्था कर अधिकारी यांचे कडून दि. 31 मार्च 2015 पूर्वी तपासणी करून घेवून सन 2013-14 चे स्थानिक संस्था कराचे निर्धारण / ASSESMENT करून घ्यावे.

( ब )  ज्या व्यापारी /व्यवसायीक  यांनी अधापही वार्षिक विवरण पत्र ( E II ) सादर केलेले नाही. त्यांनी ते तात्काळ दाखल करून, कागदपत्रे संबंधीत क्षेत्रिय कार्यालयातील, स्थानिक संस्था कर अधिकारी यांचे कडून दि. 31 मार्च 2015 पूर्वी तपासणी करून घेवून सन 2013-14 चे स्थानिक संस्था कराचे निर्धारण / ASSESMENT करून घ्यावे.

( क )  ज्या LBT धारकांनी कर निर्धारण / ASSESMENT साठी रेकॉर्ड सादर केलेले आहे. अथवा ज्यांना सन 2013-14 साठीची नोटीस प्राप्त झाली आहे. अशा नोंदनी धारकांनी या नोटीसीची दखल घेण्याची आवश्यकता नाही. अन्य सर्व LBT धारकांनी सदर नोटीसीची दखल घ्यावी.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
स्थापना
११-१०-१९८२
पिंपरी-४११०१८

( डॉ.यशवंतराव माने )
सहाय्यक आयुक्त
स्थानिक संस्था कर विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-18

जा.क्र.- स्थासंक/06/कावि/73/2015,
दिनांक - 20/03/2015